# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०-०१-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक ३० जानेवारी २०१८ रोजी (दि.८-१-२०१ ची तहकूब सभा का.प.क्र.०४) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.२५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, श्री.डी.एम.मुगळीकर भाप्रसे, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २२. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २३. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २८. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २९. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |

इति.सर्व साधारण सभा
दिनांक ३०-०१-२०१८
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०४)

| | |
|---|---|
| ३०. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३१. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३२. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३३. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३४. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३५. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३६. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३७. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३८. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४०. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४१. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४२. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४३. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४४. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४५. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४६. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४७. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४८. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४९. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५०. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५१. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५२. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५३. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५५. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५६. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५८. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५९. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६०. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६१. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६२. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६४. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६५. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ६६. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ६८. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६९. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७०. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७१. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७२. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७४. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७५. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७६. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७७. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७८. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७९. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८०. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८१. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८२. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८३. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८४. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८५. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८६. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

मा.महापौर :तहकुब सभेला सुरुवात करण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :महानगरपालिकेचे माजी महापौर श्री.प्रदीप जैस्वाल यांच्या पत्नीचे दिर्घ आजाराने निधन झाले. या सभागृहातर्फे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.बापु घडामोडे :माजी खासदार श्री.प्रदिप जैस्वाल यांच्या पत्नी श्रीमती सरोज जैस्वाल यांचे दु:खद निधन झाले. सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :सभागृहाचे माजी महापौर तथा माजी खासदार,माजी आमदार श्री.प्रदिप जैस्वाल यांच्या पत्नी श्रीमती सरोज जैस्वाल यांचे दु:खद निधन झाले. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

:(यास स.श्री.रेणुकादास वैद्य, श्रीमती किर्ती शिंदे, श्री.सिताराम सुरे, श्री.सचिन खैरे, श्री.मनोज बल्लाळ, श्री.विकास जैन, श्री.अब्दुल नाईकवाडी यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :जिल्ह्याचे माजी खासदार, माजी आमदार, शिवसैनेचे महानगर प्रमुख, या सभागृहाचे सदस्य राहिलेले स.प्रदिपजी जैस्वाल यांच्या पत्नी सौभाग्यवती. सरोजताई प्रदिपजी जैस्वाल यांचे निधन झाले. तसेच माजी उपमहापौर श्री.तरविंदरसिंगजी धिल्लन यांच्या पत्नीचे सुध्दा चार दिवसापुर्वी निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

श्री.त्र्यंबक तुपे :जिल्ह्याचे खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे साहेब यांची पक्षाचे नेते म्हणुन निवड झाली तसेच सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांची ही महाराष्ट्र युवासेनेच्या उपसचिव पदी निवड झाली. त्या बद्दल सभागृहातर्फे अभिनंदनाचा ठराव घ्यावा.

श्रीमती सिमा खरात :यास अनुमोदन आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स.श्री.राजेंद्र जंजाळ यांची राष्ट्रीय स्तरावर युवासेना उपसचिव पदी नियुक्ती झाली आहे.

श्री.सिताराम सुरे :या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

श्री.दिलीप थोरात :याला भारतीय जनता पार्टीतर्फे अनुमोदन आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :या अभिनंदनाच्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

श्री.राजु शिंदे :जो ठराव ठेवला त्यास अनुमोदन आहे तसेच या जिल्ह्याला पालक मंत्री म्हणुन श्री.सावत साहेब यांची निवड झाली. त्यांचा ही अभिनंदनाचा ठराव मंजुर करावा.

श्री.विकास जैन :या ठरावास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :दि.२३/०१/२०१८ रोजी मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या दिवशी शिवसेना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीमध्ये आदरणीय श्री.चंद्रकांत खैरे यांची शिवसेनेच्या नेते पदी निवड झाली. त्या बद्दल जो अभिनंदनाचा ठराव मांडला सभागृहामध्ये मंजुर करण्यात येतो. तसेच सभागृहाचे स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांची सुध्दा युवासेनेच्या राष्ट्रीय उपसचिव पदी निवड झाली. त्यांचा तसेच पालक मंत्री डॉ.दिपक सावत यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.राजु शिंदे :माजी पालक मंत्री श्री.रामदास कदम यांनी सुध्दा तीन वर्ष या शहरामध्ये चांगले काम केले. त्यांचा अभिनंदनाचा ठराव प्रारीत करावा.

मा.महापौर :त्यांचे ही अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात येतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये दमडी महल रस्त्यातील श्री.श्रीराम पवार यांच्या घराचे अतिक्रमणाच्या बाबतीमध्ये काही प्रश्न उपस्थित केले होते, या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी दोन दिवसाचा वेळ मागितला होता. अद्याप त्याचे उत्तर मिळालेले नाही.

मा.महापौर :आधी विषय पत्रिका पुर्ण करुन घेऊ. स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा संबंधीत अधिकारी यांनी तयार ठेवावा. विषय क्र.१७०, भुमिगत गटार योजनेचे काम पुर्ण करण्यासाठी हुडको या संस्थेकडुन कर्ज घेणे बाबतचा व त्यासाठी मनपाच्या मालमत्ता तारण गहाण ठेवण्याबाबतचा हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर प्रशासनाने ठेवलेला आहे. दि.०८-०१-२०१८ ला या विषयावर तहकुब सभा आज घेत आहे.

श्री.दिलीप थोरात :महानगरपालिकेची कराची करोडो रुपयाची थक्क बाकी आहे. वसुलीवर मनपा का लक्ष देत नाही? कर्जाचा अटापीटा न करता वसुलीत लक्ष द्यावे त्यातुन हे काम व्हावे.

श्री.विकास जैन :जे प्रोजेक्ट लावलेले आहे त्या माध्यमातुन योजनेची माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :कर्ज काढण्याची घाई का? हा प्रोजेक्ट पुर्ण झालेला आहे का? झालेल्या कामावर समाधानी आहोत का? महापालिकेची वसुली वाढवुन हे काम व्हावे.

श्रीमती सायराबानो खान:भुमिगत गटार योजनेवर सन-२०१५ पासुन माहिती विचारत आहे,अद्याप समाधानकारक उत्तर मिळाले नाही.या प्रोजेक्टवर किती पैसे महाराष्ट्र शासनाने दिले? दिलेले पैसे महापालिकेच्या खात्यावर की एजन्सीच्या खात्यावर जमा आहे? १६ कोटी रुपये महापालिकेच्या खात्यावर जमा केले होते. त्याचे व्याज कुठे खर्च केले? जे कर्ज घेत आहोत त्याचे परतफेडीचे नियोजन काय आहे?

श्री.त्र्यंबक तुपे :रु.९८ कोटीचा हा प्रस्ताव आहे. योजना पुर्ण झाली पाहिजे. एकुण किती मालमत्ता गहाण ठेवलेल्या आहेत. यासाठी किती पैसे महिन्याला देत असतो. एल-ई-डीच्या माध्यमातुन प्रोजेक्ट सुरु करणार आहोत, महिन्याला ३ कोटी रुपये द्यावे लागणार आहे. ज्या मालमत्ता तारण ठेवलेल्या आहेत, महापालिकेचे उत्पन्न किती, कर्ज देणे किती? प्रत्येक सदस्यांची मागणी आहे की, वार्डातील कामे पुर्ण व्हावीत. जे कर्ज घेणार ते फेटण्याची परिस्थिती आहे का? कोणतीच मालमत्ता गहाण ठेवण्यासारखी महापालिकेकडे नाही. यामध्ये उत्पन्न आणि देयक किती माहिती द्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :एक वर्षापासुन या योजने संदर्भात असंख्य प्रश्न उपस्थित केले. यात प्रशासनाने समाधानकारक उत्तर दिलेले नाही. ८०-९०% काम झाले असे सांगतात. फक्त जोडणी बाकी आहे. ज्या वेळेस ८०-९०% काम पुर्ण झाले आहे तर रु.९८ कोटी रुपये कशासाठी लागते. या याजेनेतुन पुर्ण नाल्यामध्ये लाईन टाकण्यात आली, आज ही नाल्यामध्ये पाणी वाहतांना दिसते? किती लाईन भुमिगत गटार चेबंरला जोडलेले आहे? एस टी पी किती, कोणत्या भागातुन पाणी जात आहे. २०१० मध्ये जनतेकडुन सिवेज टॅक्स लावण्यात आले आहे. या सिवेज टॅक्सचा पैसा कुठे गेला? महापालिकेची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. कर्ज घेण्याच्या बाबतीत पुर्ण विचार केला पाहिजे.

श्री.विकास एडके :ज्यावेळेस या प्रोजेक्टचे पैसे आले, सेंट्रल गव्हर्नमेंटचा हा प्रोजेक्ट होता. याच्यामध्ये स्टेट गव्हर्मेटचा किती हिस्सा होता, ते पैसे खात्यामध्ये आले का, तेव्हा पासुन ते आता पर्यंत कुठल्या बँकमध्ये ठेवण्यात आले, त्याच्यावर किती व्याज आले, आणि या प्रोजेक्टला टाईम पीरेड होता का? आतापर्यंत किती कर्ज घेतले? किती लोन क्लिअर केले? जी मालमत्ता गहाण ठेवायची आहे ती महापालिकेची आहे का?

श्रीमती किर्ती शिंदे :प्रकल्पास कर्ज काढण्यास विरोध नाही. नाल्याच्या बाजुला जे घरे आहेत, आणि जी लाईन टाकलेली आहे त्याची लेवल बरोबर होत नसल्यामुळे अनेक ठिकाणी पाणी उघड्यावर वाहतांना दिसते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसामध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे. जे उगड्यावर पाणी वाहते, त्या लोकांना

सुध्दा नोटीस देऊन किंवा जनजागृती करुन त्या पाण्याचे भुमिगत गटार योजनेतुन विल्हेवाट लावण्यात यावी.

श्री.राजु शिंदे :योजना किती कोटीची होती, योजना मंजुर करत असतांना किती कोटीने वाढीव दराने केली होती. यात व्याज किती मिळाले. २०१६ च्या विषय पत्रिकामध्ये आकरा कोटी, दोन कोटी, तीन कोटी रुपये बचत झाली, असे वेगवेगळे कॉलम करुन दिले होते. ही बचत झालेली रक्कम कुठे गेली? पीएमसी नेमली, डीपीआर तयार करतांना पीएमसीच्या चुका झाल्या. पीएमसीला काय दंड केला आहे. २०१६ मध्ये ९७% काम पुर्ण झाले आहे, असे माझ्याकडे मला लेखी दिले. एसटीपी मध्ये तीन ठिकाणी चेंजेस केले आहे. १४३ टीएमसी ची १४६ टीएमसी कशी होऊ शकते. सिध्दार्थ उद्यान, झाल्टा येथील एसटीपी रद्द केला आणि ही एसटीपी इतरत्र वाढवण्यात आली. ९० किलो मिटर वार्डामध्ये लाईन टाकणार होतो, आता पर्यंत किती लाईन टाकण्यात आली. जी ड्रेनेज लाईन टाकलेली असेल ती मेन सिव्हरला जोडण्यात आली आहे का? एसटीपी मधुन शहरातील पाणी जाणार नसेल तर दोन हजार किलो मी. ड्रेनेज लाईन टाकावी लागणार आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये हे कर्ज घेण्यात येऊ नये. जे काही सिवेज टॅक्समधुन, व्याजातुन, सेव्हींग मधुन पैसे जमा झाले त्यातुन हे काम करण्यात यावे.

श्री.नासेर सिद्दीकी :एजन्सीला पेमेंट दिले नाही पाहिजे. निर्णय झाला पण त्या एजन्सीला पेमेंट दिले गेले. याच्या मागे खुप मोठा भ्रष्टाचार होत आहे. याची चौकशी व्हायला पाहिजे.

श्रीमती माधुरी देशमुख :माझ्या वार्डात भुमिगत गटार योजनेचे काम झाले. एन-३, एन-४ मधुन नाला वाहतो, तेथे काम झालेले असुन आजही तेथे ड्रेनेजचे पाणी वाहत आहे. या योजनेच्या कामावर कोणताही सदस्य समाधानी नाही. या आधी कोणत्या मालमत्ता वर किती कर्ज घेतले आणि ते किती फेडले आहे. कर्ज काढण्या पेक्षा वसुलीवर भर देऊन, आधीचे जे कर्ज काढलेले आहे त्याचे ऑडिट करुन, ज्या मालमत्तावर महापालिकेचे नाव लागलेले नाही, त्या मालमत्तेवर नाव लावण्यासाठी काय प्रयत्न केले. कर्ज काढण्याआधी सगळया गोष्टींचा विचार व्हावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :भुमिगत गटार योजनेचे काम देण्यात आले तेव्हा त्यांना किती कालावधी देण्यात आला? जी मुद्दत दिली होती, त्या मुद्दतीमध्ये काम झालेले नाही. जी मुदत वाढ देण्यात आली त्याला सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली का? काम पुर्ण करण्यासाठी जो उशीर झाला त्या ची कॉस्ट किती लागली. मुबंईमध्ये जो मेट्रोचा प्रकल्प चालु होता, ते प्रकरण कोर्टात गेल्या नंतर कंपनीने सांगितले की, प्रोजेक्ट पुर्ण करण्यासाठी जो उशीर लागतो त्यासाठी पर डे दोन कोटी रुपये डीले कॉस्ट लागणार आहे. भुमिगतचे काम करण्यासाठी जो उशीर झालेला आहे, त्याची डीले कॉस्ट किती आहे. जे कर्ज घेतलेले, त्याचे हप्ते किती. मनपाने जे विकास कामे केले आहे त्याचे देयक किती, मनपाचे पाणी पुरवठ्याचे विज बिल किती देणे आहे. सभागृहामध्ये या कामाच्या बाबतीत

अनेक चर्चा झाली परंतु भुमिगत योजना एजन्सीला कोणत्याच प्रकारचे दंड लावण्यात आलेले नाही. डीपीआर मधे ज्या नाल्यावरुन सिवेज लाईन दाखवलेले होती, त्या नाल्याचे अतिक्रमण निषकाशित करता येत नाही म्हणुन ती रस्त्यावरुन टाकली. त्या रस्त्याचे रिपेरिंगचा खर्च या निधीतुन दिलेला होता. नेमके यात किती पैसा खर्च झाला. माहिती द्यावी.

श्री.भगवान घडमोडे :प्रस्ताव ठेवत असतांना सगळ्या बाबींचा विचार केलेला दिसत नाही. ९०%, ९७%, ७५% काम झाले. मग आता काम बाकी किती आहे? कर्ज काढत असतांना काही नियमावली आहे, कुढल्या नियमानुसार हा ठराव आला, महसुल उत्पन्न वाटा टाकु असे सांगितले असेल, तर आज ९८ कोटी रुपयाचे कर्ज काढण्याची गरज का भासते. कर्ज किती आहे, किती हाप्ते द्यावे लागतात, किती कॅपीसीटी कर्ज फेडण्याची आहे. या कामासाठी ३०-३५ कोटी रुपये लागणार असतील ते महसुल उत्पन्नामधुन करण्यात यावे.

श्री.गंगाधर ढगे :शहरातील एक सुध्दा नाला स्वच्छ झालेला नाही. योजना आली असतांना शहर वासीयांना आणि सभागृहाला सांगण्यात आले की, शहरातील सर्व दुषित पाणी भुमिगत लाईन करुन त्याठिकाणी घाण पाणी किंवा दुषित पाणी शहराबाहेर नेण्यात येईल. माझ्या वार्डात महानगरपालिकेच्या बाजुला दोन नाले. यामध्ये चार कोटी रुपये खर्च केले तरी पण ते दोन्ही नालेतुन पाणी वाहत आहे. जयभिम नगर ते औरंगपुरा सिव्हर लाईन टाकण्यात आलेली आहे. त्यावर दोन कोटी रुपये खर्च झाले. ती लाईन आता चोकअप झाली आहे, तिची डिप वीस फुट आहे. हे चोकप कसे काढणार.

श्री.रावसाहेब आमले :शहरामध्ये ३६५ कोटी रुपयेची भुमिगत गटार योजना राबवण्यात आली. त्यापैकी एक लाख माझ्या वार्डात खर्च केला असता तरी मला समाधान वाटले असते. ३६५ कोटीची योजना काही ठराविक वार्डांसाठीच आणली होती का, कोणत्या ठिकाणी काम केले. वारंवार पत्र व्यवहार करुन माझ्या वार्डात काम झाले नाही. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.इरशाद खान :या प्रोजेक्टचा डीपीआर तयार केला होता, कॉस्ट फाईनल केली होती, कामाचा कालावधी पण देण्यात आला होता. या कामासाठी किती कालावधी लागणार होता. जो उशीर होतो त्याचा भुर्दंड महानगरपालिका की कंपनी भरणार आहे. माझ्या वार्डात एका जागेचा प्रश्न होता, आमच्याकडुन पत्र ईशुव्ह करुन घेण्यात आले की, तुमची जागा निघत असेल तर त्याचा मोबदला नियमानुसार देण्यात येईल. समोरच्या व्यक्तीने आधीच ३ एक्कर १७ गुंठे जागेचा मोबदला घेतलेला आहे. त्या व्यक्तीला टाऊन प्लॉनिंग परत मोबदला देण्याचे प्रयत्न करत आहे. रहेमानिया कॉलनी मध्ये गरीब लोकांचे घर तोडुन सिवेज लाईन टाकण्यात आली. वार्डात जाण्यासाठी नाल्यावर तीन ब्रिज बनवलेले होते. ते तोडुन सिव्हर लाईन टाकण्यात आली. पुल बनवण्याची मागणी केली तर, प्रकरण मा. कोर्टात आहे असे सांगतात.

श्री.रामेश्वर भादवे :मुख्य नाल्यामधुन लाईन टाकत असतांना काही इंटरनल लाईन टाकली. ३६५ कोटीच्या योजनेतील पैसे कसे संपले. जे मेन चेंबर बनवत असतो ते किती

अंतरावर बनवले आहे. यांनी ५-५ फुटावर चेंबर लाईन घेतलेली आहे. एक मेन होलची किंमत लाख रुपये आहे. हा खर्च वाढला, ३६५ कोटी रुपयाची चौकशी झाली पाहिजे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कोणतेही काम हाती घेण्याआधी त्याचे नियोजन केले जाते. शहरामध्ये अंडर ग्राऊड ड्रेनेज लाईन टाकण्याआधी एक आराखडा बनवला असेल, त्या आराखड्यानुसार किती बजेट लागणार याची पुर्ण माहिती घेतली असेल, ड्रेनेज लाईनचे काम किती झाले असे विचारले कि, ८०%,८५%,९०% झाले असे सांगतात. बिहारमध्ये किंवा जळगावमध्ये विकास काम करतांना अनियमितता झाली त्यामुळे येथे ही होऊ शकते. अशा लोकांवर कार्यवाही झाली. ९७% काम पुर्ण झाल्यावर कर्ज कशासाठी घेण्यात येत आहे. जी जागा ठेवणार आहे ती मनपाची आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :काम झाले आहे ते तपासण्यासाठी कुठलीही यंत्रणा मनपाकडे नाही. काम किती झाले, त्याची गुणवत्ता काय. योजनेमध्ये अतिरिक्त खर्च लागला असेल तर त्यात पीएमसी ची चुक किती? वार्डातील नाल्याचे पाणी लाईन मधुन बायपास झाले नाही, उघड्यावर पाणी वाहु नये. ५०० कोटी पेक्षा जास्त स्थानिक कॉन्ट्रॅक्टरचे पैसे द्यायचे आहे. याच्यासाठी पण कर्ज काढणार आहे का? गुणवत्ता आणि पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणार कोण,म न पा अधिकारी देऊ शकत नाही, पीएमसी देऊ शकत नाही, मग याच्यासाठी एखादी नामंकित संस्था नियुक्त करायला पाहिजे. गुणवत्ता तपासली पाहिजे, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले पाहिजे. त्यानंतर बिल दयावे. ही योजना पुर्ण होत असतांना अधिकारी, पीएमसी असतील थर्ड पार्टि इनस्पेक्शन करणारे असतील या लोकांना तितकिच जबाबदारी असायला हवी. हा पैसा भुमिगत योजनेवर वाया जाऊ नये. याचा विचार केला पाहिजे.

श्री.अजीम अहेमद :नेहरु नगर ते किराडपुरा नाला आहे, लाईन टाकुन सुध्दा ७-८ महिने झाले अद्याप लाईन जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्त्याचे काम थांबले, नाल्यातुन पाणी वाहते आहे. जे दोषी असेल यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्रीमती मनिषा मुंढे :शहरामध्ये किती ठिकाणी गटार योजनेची कामे केलेली आहे, किती नाल्यातुन आज पाणी जाते, किती कोरडे आहे.

श्री.प्रमोद राठोड :दि.३०.११.२०१६ रोजी याच सभागृहात बैठक झाली होती तेव्हा श्री.बकोरीया आयुक्त होते. या योजनेवरती चर्चा झाली होती. त्यावेळेस हे सर्व प्रश्न उपस्थित झाले होते. अचानक रु.१०० कोटीची कमतरता अधिकारी, प्रशासनाला कशी जाणवली? पाण्याचा मोठा प्रश्न सोडवायचा असतांना १०० कोटी रुपये या भुमिगत योजनेला पुर्ण करण्यासाठी लागत आहे. योजना पुर्ण करायची असेल तर पैसे लागतील, पैसे लागतील तर कर्ज घ्यावे लागेल, कर्ज घ्यायच असेल तर शहरवासीयांच्या डोक्यावर टाकावे लागेल. याचे स्पष्टीकरण देत नाही. कसे कर्ज काढायचे, कसे गुप्तदाराला द्यायचे, जो काही लाभ त्यांना घ्यायचा आहे त्यासाठी प्रयत्न चालु आहे. ही योजना पुर्ण करण्याकरिता महापलिकेच्या

फंडातुन मालमत्ता वसुली किंवा इतर उद्दिष्टे च्या माध्यमातुन वसुली करुन पुर्ण करावी. यात कुठल्याही प्रकारचे कर्ज काढु नये.

श्रीमती आशा निकाळजे :श्री.तुपे महापौर असतांना माझ्या वार्डात भुमिगत गटार योजनेचे काम सुरु केले होते. परंतु ते अर्धवट काम करुन नाल्यामध्ये पाणी सोडुन दिले आहे.

श्री.गजानन मनगटे :९८ कोटी ही रक्कम कशी काढण्यात आली. यासाठी कोणत्या सदस्यांना विश्वासात घेतले होते, कोणत्या वार्डामध्ये कामे बाकी आहे असे विचारले होते का, जर या योजनेला पुर्ण करायचे आहे तर लाईट सेक्शनचा स्मार्ट सिटीमध्ये उपयोग घेतला तसेच या स्मार्ट सिटीमधुन पैसे देऊ शकतो. त्यातुन काम करु शकतो.

श्री.आत्माराम पवार :श्री.अफसर सिद्दिकी यांना सांगतो की, माझ्या वार्डातले काम बाकी आहे. आणि हे म्हणतात ९७% काम पुर्ण झालेले आहे. मग ९८ कोटी रुपये कशासाठी घेतो. महानगरपालिकेचा उत्पन्न कमी प्रमाणात, आणि देणे जास्त आहे. अनेक मिळकतीला टॅक्स लावणे बाकी आहे. गुंठेवारी भागात डबल टॅक्स देतात, लिगल भागामध्ये सिंगल टॅक्स देतात. आमच्याकडे काम करायचे म्हंटले की, गुंठेवारी भाग आहे काम होत नाही असे सांगतात. खुलासा झाला पाहिजे.

श्री.अफसर खॉन :३६५ कोटी रुपयाच्या योजनेमध्ये ही बडोतरी कशी झाली. स्टेट गव्हर्नमेंटचा किती हिस्सा आला, कार्पोरेशनचा किती हिस्सा टाकायचा होता, ९८ कोटी रुपये कोणाला द्यायचे आहे. जागा तारण ठेऊन कर्ज घेऊन हे पैसे देण्यात येऊ नये.

मा.महापौर :सर्व स.सदस्यांनी विचारलेले प्रश्नाचे समाधारकारक खुलासा करण्यात यावा. अकाऊंटशी रिलेटेड कर्ज कोणत्या कारणासाठी घेण्यात आले होते.

मुख्य लेखाधिकारी :दोन लोन घेतले होते. पहिले एल आय सी लोन थ्रो, जीवन प्राधिकरण ते सध्या २१,९७ कोटी रुपये मुळ रक्कम प्रलंबित आहे. आणि ओपन मार्केट थ्रो जीवन प्राधिकरण घेतलेले होते ती १९,४० कोटी रुपये बाकी आहे. अशी ती ४१,१० कोटी रुपये ची रक्कम आहे. आधी १९७७ मध्ये घेतलेल्या लोनची परत फेड १९९८ पर्यंत केली. त्या नंतर परत फेड केलेली नाही. आणि दुसरे ओपन मार्केट लोन १९९० ला ४६,०० कोटी रुपये घेतले होते ते १९९८ पर्यंत परत फेड केले होते त्यातील ४१,०० कोटी रक्कम रुपये भरणे बाकी आहे. त्यावेळी सहा महिन्याचे हप्ते पहिल्या लोनची रक्कम होती १,५०००००/- रुपये आणि दुसऱ्या लोनची रक्कम ३,००००००/- रुपये होती. ४१,००००००/- रुपये मध्ये आता पर्यंत भरणा १९,४५०००0/- रुपये केली आहे. दुसरे दोन लोन घेतलेले आहे, पहिले थकीत विज देयक भरणा करण्यासाठी १.९.२०१२ ला आय डी बी आय बँके मार्फत ९७,७३ कोटी रुपये घेतले. त्याचा प्रिंसिपल अमाऊंटचा मासिक हप्ता ८०,५० लाख रुपये आहे. आणि मुळ रक्कम व व्याज ४४,२७०००/- रुपये भरत आहे. याचे रेगुलर हप्ते भरणे चालु आहे. पुर्ण थकबाकी ९७,८० कोटी रुपये इतकी आहे. आणि दुसरे लोन १.४.२०१३ ला ९४,५० कोटी रुपये वॉटर वर्क समांतर अंतर्गत घेण्यात आले होते. त्याची पण नियमीत परत फेड चालु आहे. आज पहिल्या विज देयक लोनची थकबाकी ४३,४७००००/- रुपये आहे आणि

दुसऱ्या लोनची ५४,३३००००/- रुपये आहे. अशी पुर्ण ९७,८०००००/- रुपये थकबाकी आहे. एलआयसी लोन, जीवन प्राधिकरण लोन सर्व मिळुन आता पर्यंतची थकबाकी १३८,०० कोटी रुपये इतकी आहे. विकास कामाचे बी१ टेंडरच्या बिलाची ३३,००००००/- रुपये प्रलंबित देयक आहे. मेजर थकबाकी स्ट्रीट लाईटची १७,००००००/- रुपये आहे. त्यांना ३२ कोटीचा प्रस्ताव दिला होता. २० कोटी प्रिंसीपल अमाऊंट आणि १२ कोटी व्याज होते, प्रिंसीपल अमाऊंट फेब्रुवारी १६ पर्यंत देयक समायोजित केले आहे. आणि मागच्या महिन्यापासुन मार्च महिन्याचे देयक १ कोटी भरलेले आहे असे दर महिन्याला १ कोटीचे बिल भरत आहोत.

श्री.राजेंद्र जंजाळ :सध्याचे विज बिल, स्ट्रीट लाईट, पाणी योजना सगळे बिल किती बाकी आहे?

मुख्य लेखाधिकारी :स्ट्रीट लाईट चे १७,२५ कोटी रुपये बाकी आहे, आणि सध्या बिल पेंडिग लेखा विभागात आहे, वॉटर वर्कचे ३,२७०००००/- रुपये बाकी आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :महिन्याला किती देणे लागते. सध्या महापालिकेत जमा किती होते.

मुख्य लेखाधिकारी :मागिल वर्षाप्रमाणे आणि चालु वर्षाची ॲावरेज जे जमा ५९० ते ५९५ कोटी अपेक्षित आहे. आणि बांधिल खर्च ५६५ कोटी पर्यंत जातो. आजपर्यंत देणे ८०,००००००/- रुपये आहे.

श्री.भगवान घडमोडे :महिन्याला साधारणः किती हप्ता भरावा लागतो.

मुख्य लेखाधिकारी :नियमीत पणे महिन्याला २,५८००००/- रुपये भरत आहे.

श्री.भगवान घडमोडे :एलईटी चालु, देयक द्यावे लागेल तेव्हा त्यांना दर महिना किती द्यायचे आहे?

मुख्य लेखाधिकारी :दरमहा २,७२ कोटी रुपये द्यावे लागणार आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :कर्जाचे हप्ते भरत नाही त्यासहीत दर महिण्याला किती रक्कम कर्ज म्हणून देय करावी लागणार तसेच एक्स्पीडीचर विकास काम व इतर द्यावयाची रक्कम किती आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :जेवढे कर्ज घेतले त्यातील किती खाते एनपीए मध्ये गेले.

मुख्य लेखाधिकारी :सन २०१२-१३ जे कर्ज ची नियमीत परतफेड चालू आहे.एकूण चार कर्ज घेतले एलआयसी कडून कर्ज घेतले. एनपीएमध्ये किती खाते आहे? माहिती घ्यावी लागेल.

श्री.दिलीप थोरात :बँकेचे कर्ज भरत नाही म्हणजे ते एनपीए झालेले आहे.

श्री.राजू शिंदे :कर्जापोटी एकूण कर्जाचा हप्ता किती? एलईडी लाईटचा, डिफरचे रस्ते, पगारापोटी किती रक्कम द्यावी लागते?महापालिकेचे एकूण मासिक उत्पन्न किती व देणे किती आहे?

मुख्य लेखाधिकारी :डीफरचे पाच बिले प्रलंबीत आहे ऑगस्ट-२०१८ ला डिव्ह पेमेंन्ट आहे.

मा.महापौर :एकूण मासिक ठराविक देयक किती? कशाचे किती देणे आहे? विकास कामाचे देयक किती? भविष्यात मार्च पर्यंत किती देणे द्यावे लागेल?

श्री.राजेंद्र जंजाळ :सन-१९९८ पासून काही कर्जाचे हप्ते भरणे बंद केले कोणत्या मालमत्ता गहाण ठेवल्या त्याचे काय होणार आहे? जे कर्ज घेता त्या बाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६ मध्ये ११२ मध्ये दिले की, कर्ज घेतल्यानंतर त्याची कर्ज निवारण निधी स्थापन करायला पाहिजे.कलम १२६

मध्ये दिले की कर्जाचे वार्षीक विवरण मा.आयुक्तांनी तयार करून कलम ई-२ प्रमाणे या सभेसमोर आणले पाहिजे.आताच म्हटले की १९७७ कर्ज घेतले तेंव्हा पासून तसे विवरण सभेपूढे आणले होते का? आणले नसेल तर मनपाचा जो नियम आहे ते सोडून काम करीत आहोत का?

श्री.अब्दुल नाईकवाडी :सन-१९७७ कर्ज घेतले केंव्हापासून हप्ते भरणे बंद आहे. सन १९९० मध्ये कर्ज घेतले त्यावेळी कोणत्या मालमत्ता गहाण ठेवल्या त्या कर्जाचे किती हप्ते भरले व बाकी किती आहे?

मा.महापौर :मालमत्ता, लेखा व भुमिगत गटार योजना अशा तीन विभागाच्या प्रश्न आहे.त्याची एकत्रित माहिती सदस्यांना देण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे :कर्ज घेणे बाबतची नियमावली सर्व सदस्यांना द्यावी. १२६ कलम नुसार विवरण सभागृहाला समोर यायला पाहिजे. शासनाला याची माहिती देणे आवश्यक होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :लेखा विभागाशी संबधीत प्रश्न आहे. कर्ज विवारण निधी स्थापन केला का ?

श्री.राजू शिंदे :पगारासह,कर्जाचे हप्ते व इतर मासिक देणे किती व उत्पन्न किती आहे.

मुख्यलेखाधिकारी :दरमहा किती देणे व उत्पन्न किती या बाबतची माहिती लगेच तयार नाही. यापुर्वी कर्ज घेतले कर्ज निवारण निधी स्थापन केलेला नाही. आयडीबीआय बँकेकडून कर्ज घेतले त्यावेळेच्या अॅग्रीमेंन्ट नुसार महापालिकेचे खाते त्यांचेकडे वर्ग झाले आहे.त्यातून दरमहा परस्पर रक्कम वळती केली जाते.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे कर्ज घेतो त्या बाबतीत प्रकरण १० कलम ११२ मध्ये दिले की कर्ज घेत असतांना कर्ज निवारण निधीची स्थापना केली पाहिजे.ते केले नाही याचा अर्थ अधिकारी मा.आयुक्तांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहे.कलम १२६ नुसार आयुक्तांनी प्रत्येक वर्षी कर्जाचे विवरण तयार करून सभागृहा समोर आणले पाहिजे.परंतु तसे झाले नाही. वार्षीक ऑडीट मध्ये हा मुद्दा आला नाही का?

श्री.भगवान घडमोडे :कलम १२६ नुसार कर्जाची माहितीचे विवरण सभे समोर आले पाहिजे.त्याची माहिती महालेखापाल यांना तसेच शासनास कळविली पाहिजे तसे झालेले नाही उलट ९८ कोटी कर्ज घेणेचा प्रस्ताव येतो. सभागृहाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत आहे हे योग्य नाही. १०९ कलम नुसार अटी शर्ती आहेत का ,त्या सुध्दा नाही.

श्री.राजू शिंदे :लेखा परीक्षण विभागाने ऑडीट केले असेल तर आतापर्यत ऑडीट ऑब्जेक्शन का आले नाही.

श्री.प्रमोद राठोड :१०९,१२६ काय नियम आहे ते सचिव यांनी वाचून दाखवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :१०९ कलम मोठे आहे १२६ वाचून दाखवावे.

नगरसचिव :प्रकरण १० मधील कर्ज घेणेचे प्रकारामधील कलम १२६नुसार आयुक्तांनी वार्षीक विवरण पत्र तयार करणे. (अ,ब,क,ड,ई व क्र.२ वाचन करतात.)

श्री.भगवान घडमोडे :जे वाचन केले त्यानुसार व नियमानुसार कर्ज घेणेसाठी सर्व प्रोसेस केली का?

श्री.राजेंद्र जंजाळ :नियमानुसार केले असते तर प्रश्न निर्माण झाले नसते. नेमके कर्ज किती घेतले परतफेड किती केले, कर्ज देणे किती बाकी आहे, व्याजाचा हिस्सा किती, सर्व विवरण सभागृहासमोर आले असते तर हे प्रश्न उपस्थित झाले नसते.

ठराव आणतांना सर्व बाबींचा अभ्यास केला पाहिजे व ठरावात त्यांचा उल्लेख पाहिजे. १९९८ पासून कर्जाचे हप्ते भरत नाही त्यावेळी कोणत्या मालमत्ता दिल्या होत्या. हे सुध्दा माहित नाही आता कर्ज घेणार मालमत्ता देणार, कर्ज घेतले हे विसरून जातो हे बरोबर नाही. कोणतेही कर्ज घेण्याच्या भानगडीत पडू नये. मालमत्ता वसुलीचे टारगेट पुर्ण करणार असे पेपरला वाचण्यात आले कराची वसूल केली तर ५५ कोटी त्यातून या कामासाठी देता येतील. कर वसुलीचा विभाग सक्षम करावा. कर वसूल होऊ शकतो त्यातून या कामासाठी पैसे दयावे काम पूर्ण करावे.

श्रीमती सायरा बानो :ही योजना केंव्हा सुरू झाली व केंव्हा संपणार आहे?

श्री.जहागीर खान :आमच्या वार्डात काम होत नाही वसुली करावी कर्ज घेण्याची गरज नाही.

श्री.जमीर कादरी :मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेणे योग्य नाही. यापुर्वीही कर्ज घेतले आहे कराची वसुली का होत नाही कर्ज न घेता हे काम करणेसाठी शासनाकडून निधी मागवावा.

श्री.राजगौरव वानखेडे :सिवरेज कर किती जमा झाला त्यांचे स्वतंत्र अंकाऊट होते का? तो पैसा कूठे खर्च केला?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :कर्ज संदर्भात हुडकोचे मुख्य संचालक मा.आयुक्ताकडे आले होते डिटेल्स माहिती मांडली. ही वित्तीय व शासनाने नेमलेली संस्था आहे.महापालिका एवढा पैसा उभा करू शकत नाही त्यामूळे कर्जाच्या स्वरूपाने या संस्थेकडून कर्ज घेता येते. ते घ्यायचे की नाही हे धोरण ठरवावे लागेल तो सभेचा अधिकार आहे. ९.६५ टक्के प्रमाणे हे कर्ज आहे. हुडकोचे अधिकारी यांचे समोर मा.आयुक्तांनी सुचना केली होती की कोणतीही प्रॅापर्टी गहाण न ठेवता काही तरतूद असेल तर दाखवा. परंतु तशी तरतूद नाही असे म्हटले.

श्री.दिलीप थोरात :कर्ज न घेता वसुलीवर भर देऊन या योजनेचे काम पुर्ण करून घ्यावे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :यावर प्रशासन व महासभा योग्य निर्णय घेतील.

श्री.रेणुकादास वैद्य :कर्ज न घेता ही योजना पुर्ण करता येईल का?

श्री.राजगौरव वानखेडे :मनपाचा हिस्सा हा सिवरेज टॅक्स मधून देणार होतो त्यानुसार करामध्ये जनतेकडून वसुल केले ४५-५० कोटी जमा होते कुठे खर्च केला ते असते तर कर्ज घेण्याची गरज नव्हती.

श्री.त्र्यंबक तुपे :कर्ज घेतांना कोणत्या प्रॅापर्टी गहाण ठेवणार आहे.

श्री.विकास जैन :हा प्रोजेक्ट कशामध्ये होता शासन बदलले तर कशामध्ये हा प्रोजेक्ट गेला.केंद्र व राज्य आणि मनपाचा हिस्सा किती ,नगरोत्थानमधून युआयडीएसएसएमटी मध्ये आले नंतर अमृत योजनेत हा प्रोजेक्ट आला त्यात मनपाचा हिस्सा किती वाढला. ३६५ चा ४६० वर प्रोजेक्ट कसा गेला.कुठे किती काम झाले.सर्व माहिती घ्यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :चुक कुठे झाली? जे की कर्ज घेण्याची वेळ आलीघ

श्री.राजगौरव वानखेडे :८०-८५ टक्के काम झाले असेल तर कर्ज घेण्याची गरज काय?

श्री.प्रमोद राठोड :दि.३०-११-२०१६ च्या बैठकीत या प्रोजेक्टची सर्व माहिती दिलेली होती. आता कर्ज कशासाठी घ्यायचे आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नरोत्थान योजनेतून ३६५ कोटीचा हा प्रोजेक्ट होता त्यात केंद्र शासन ८०, राज्य शासन १० व मनपा १० टक्के निधी महापालिकेला टाकायचा होता. रितसर निविदा काढली खिल्लारी कन्स्ट्रक्शनने काम घेतले ३६५ ची योजना ३६४ मध्ये गेली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने हा प्रोजेक्ट ट्रान्झेशन फेज मध्ये मंजूर झाला असल्या कारणाने आणि सुवर्ण जयंती महाअभियान योंजना बंद झाल्याने युआयडीएसएसएमटी मध्ये आल्याची सुचना केली.युआयडीएसएसएमटी नंतर तो प्रकल्प अमृत योजनेत गेला.

श्री.राजू शिंदे :योजनेत बदल झाला तर त्यासाठी शासनाकडे काय पाठपुरावा केला.जर योजनेचे काही प्रमाणात काम झाले तर शासनाला योजनेचा निधी कमी करता येत नाही. केले असेल तर पाठपुरावा का केला नाही.योजना चेंज झाल्यामूळे मनपाला जास्त हिस्सा भरावा लागतो आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :शासनाने ही योजना चेंज केली.त्यामूळे राज्य शासन १० व मनपाचा १० टक्के हिस्सा वाढला. शासनाकडे वाढीव १० टक्के हिस्सा मागीतला परंतु शासनाने असे म्हटले की, हा निधी मनपानेच उभारावा.अमृत योजनेत ६०-२०-२० असे फंडीग आहे.

श्री.राजू शिंदे :१० टक्के रक्कम कमी पडत आहे पुर्वीच ही स्कीम येते वेळेस या योजनेचे अंदाजपत्रक वाढवून घेतले होते.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :९८ कोटी हे टेंडर एक्सेप्टेड मध्ये फरकाची आहे. २०१३ मध्ये ऑलरेडी लोनचा ठराव मंजूर केला होता त्यावेळी कर्ज घेतले नाही. कर्ज घेतले असते तर व्याज सुरू झाले असते त्यावेळी रक्कम होती.

श्री.राजू शिंदे :काम सुरू होणार तसेच निविदा काढत असतांना योग्यतेची निर्मिती ओ ॲण्ड एम एकत्रित निविदा काढल्याचे दिसते. परंतु सह निविदा दर त्यावेळेस मंजूर केलेला आहे प्रशासकीय मान्यता ही निर्मिती खर्चालाच होती दोन्ही मिळून होती याचा बोध होत नाही त्याचा अभिप्राय विभागाने द्यावा तसेच योजनेचा व रक्कम १५३.१७ कोटी व या प्रमाणे रक्कम ६४ कोटी दोन्ही रक्कम देणे मनपास शक्य दिसत नाही उपरोक्त प्रमाणे अभिप्रायाच्या संचिका अवलोनार्थ व पुढील कार्यवाहीस्तव असे म्हटले याचा अर्थ काय होतो? याचा अर्थ दोन्ही रक्कमा मिळाल्यानंतर कुठेही बोध होत नाही.

मा.महापौर :ऑपरेट व मेन्टेनन्संची जी निविदा होती त्या संबंधी ते आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :१५३ हिशोब असा की ५४.८५ कोटी उर्वरीत हिस्सा टाकायचा व ९८ कोटी कर्जाची मागणी हे दोन्ही मिळून १५३ कोटी होतात

श्री.राजू शिंदे :पीएमसीच्या चुकामूळे महापालिकेला काही ठिकाणी खर्च करावा लागला आहे. या योजनेच्या पैशावर किती व्याज मिळाले होते.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :२२ कोटी व्याज मिळाले.

श्री.राजू शिंदे :२२ कोटी व्याज मिळाले काही ठिकाणी कामात रु.११ कोटी, अडीच कोटी साडेतीन कोटी अशी एकूण ३०-३५ कोटी बचत व व्याज २२ असे मिळून ५० कोटी होते असे असतांना कर्ज काढण्याची वेळ का आली?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :रु.४६४ कोटीचा प्रोजेक्ट ४१८ वर आणत आहोत त्यात बचत होत आहे.

श्री.भगवान घडमोडे :बचत केली तर आता कर्ज काढण्याची गरज नाही.हा प्रस्ताव रद्य करावा.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :५२ कोटी कर्ज घ्यावे लागेल.

श्री.राजू शिंदे :१० टक्के हिस्सा जो वाढीव टाकावा लागणार होता तेवढी सेव्हींग झाली. एसटीपीचे ११ कोटी बचत झाली त्या एजन्सीला वाढीव दराचा फरक सुध्दा देऊन टाकला ते काम झाल्यानंतर का दिले नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :एसटीपीमध्ये सव्वा कोटीची बचत झाली आहे.

श्री.प्रमोद राठोड :दि.३०-११-२०१६ च्या सभेत जी माहिती दिली त्यात ६ एसटीपी ऐवजी ४ एसटीपी केले आहे.

श्री.राजू शिंदे :दि.३०-११-२०१६ ची विषय पत्रिकेत असे म्हटले की ६ ठिकाणी सिव्हरेज प्लॅन्ट बांधण्याचे नियोजन होते त्यापैकी सिध्दार्थ उद्यान व विमान तळाच्या शेजारील एसटीपी रद्य करण्यात आली असून त्याची बचत ११.५१ कोटी झाली असे म्हटले. इतर बचत मिळून १९ कोटीची बचत झाली आहे.

मा.महापौर :जेव्हा हा प्रोजेक्ट रिवाईज झाला त्यास सभागृहाने मान्यता दिली आहे. एक्स्ट्रा ॲटम चा खर्च व बचत यास मान्यता दिली. या सर्व गोष्टी समोर आल्या होत्या

श्री.राजू शिंदे :प्रशासनाने मान्यता केली सभागृहाने मान्यता दिली नाही भारतीय जनता पार्टीचा यास विरोध होता. एसटीपीसाठी जागा ठेकेदाराने घेतली व ती घेणेसाठी महापालिका तर्फे विनंती करण्यात आली.असे दि.३०-११-२०१६ च्या सभेत दिले महापालिका म्हणजे सभागृह सभागृहाने कधी विनंती केली. त्या वेळेच्या प्रस्तावात असे दिले की क्षेत्रफळ ४० आर गोलवाडी येथील गट नं. ८० मधून ४० आर जागा पुर्वीचा वार्ड क्र.९८ वळदगाव शिवार गट नंबर ६२ क्षेत्रामध्ये आर ३ येथे उभारावयाच्या मल जल प्रक्रिया केंद्रासाठी व सिवेज पंपीग स्टेशनसाठी खुल्या बाजारातील प्रचलित दराने जागा खरेदी केल्या आहेत आणि सदर जागेवर प्रकल्पाची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. म्हणजे जागा घेणेचे एजन्सीला परवानगी दिली. असे प्रशासनाचे म्हणणे आहे. ती जागा घेणेची महापालिकेतर्फे विनती केली असे दिले. मुख्य रोडवर जर १ कोटी किंमत असेल तर तीच जागा नाल्याच्या बाजूला २०-२५ लक्ष किमत असते.आता कोणत्या दराने पैसे देणार आर्थीक परीस्थिती बरोबर नसल्याने परवानगी दिली नंतर तीन महिण्यात पुन्हा प्रस्ताव आणतो तर तीन महिण्यात परीस्थिती सुधारली का जे की, एजन्सीला त्या जागेचा सिध्द सिघ्र गणक दरानुसार मोबदला दयावा लागणार आहे असे म्हटले. त्यास आम्ही विरोध केला होता.एसटीपी साठी जी जागा घेतली त्याचा मोबदला दिला का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :कुठलेही जागेचे पैसे दिले नाही टी पी विभाग त्याचे रेट ठरवतील. त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे :जर ती जागा २० लक्षची असेल व त्यांनी ५ कोटी मागीतले तर द्यावे लागणार आहे. यात असेही म्हटले की व्याजाची जी रक्कम येणार आहे त्यातून ही रक्कम द्यावी. परस्पर निर्णय प्रशासनाने घेतला पैसे कसे येणार हे सांगत नाही पैसे कसे दयायचे, कर्ज कसे घ्यायचे प्रशासनच सांगणार हे योग्य नाही. प्रॉपर्टी

रिकामी कोणती हे प्रशासनाच ठरविणार व कर्ज कसे फेडायचे हे सभागृहाने सांगायचे हे योग्य नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :एकूण तीन जागा आहे पडेगावला एक एकर जागा आहे.गोलवाडीला ४०आर आहे महापालिका प्रशासनाने विनंती केली आहे.

श्री.राजू शिंदे :अधिकारी ठेकेदाराच्या हितासाठी काम करतात महापालिकेचे हित बघीतले जात नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :कर्ज घ्यायचे की नाही ते ठरवावे विषय संपवावा आमचा यास विरोध आहे.

श्री.राजू शिंदे :यावर मतदान घ्यावे

या वेळी सदस्य कर्ज घेण्यास विरोध करतात.

मा.महापौर :सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ दुपारी १-५५ वा.पुन्हा सभेला सुरूवात २-५५ वा.)

श्री गंगाधर ढगे :बारूदगर नाल्यात लाईन टाकली तरी पुन्हा नाल्यातूनच पाणी वाहते.

श्री.त्र्यंबक तुपे :जे प्रश्न सदस्यांनी दिले ते प्रत्येक मिटींगमध्ये प्रथेप्रमाणे घ्यावे.

मा.महापौर :या महिन्याची जी रेग्युलर सभा आहे त्यात प्रश्नापासून सुरूवात केली जाईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :प्रश्नाचे उत्तरे अद्याप मिळाले नाही.

मा.महापौर :स.सदस्यांनी जे प्रश्न दिले आहे सचिव विभागाने संबंधीत विभागाकडे पाठविले आहे. त्याची उत्तरे किमान सदस्यांना सभेच्या तीन दिवस अगोदर दिली जावी.

श्री.त्र्यंबक तुपे :जो प्रस्ताव समोर आहे. त्या संदर्भात कुठल्या मालमत्ता गहाण ठेवणार आहे

कार्य.अभियंता-ड्रेनेज :यापुर्वी ज्या मालमत्ता तारण ठेवलेल्या नाही. अशा मिळकतीची यादी मालमत्ता विभागाने त्याची लिस्ट दिली आहे .

श्री.नासेर सिद्दीकी :हा रु.४०० कोटीचा विषय आहे. या विषयासाठी स्पेशल बैठक आयोजित करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मालमत्ताची यादी नसेल तर नावासहीत प्रस्ताव सुधारीत यावा. हा प्रस्ताव रद्द करावा.

मा.महापौर :आधी ज्या मालमत्ता गहाण ठेवल्या. त्या सोडून आता ज्या ठेवायच्या प्रस्तावित आहे त्याची माहिती द्यावी.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :मालमत्ता विभागाने रितसर १६ अधिक मालमत्ताची यादी दिली आहे.आणखी आठ प्रॉपर्टी आहे.

श्री.राजु शिंदे :आतापर्यत किती व कोणत्या मालमत्ता गहाण ठेवल्या.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :जी मालमत्ता गहाण ठेवता येईल ती यादी आहे. त्यात सीटीएस नं.१५३०६/१, तसेच १५०७ रिलायन्स मॉललगत मनपा इमारत गारखेडा परीसर तळमजला इमारती समोरील पुर्व बाजू १५३ चौ.मीटर इमारतीचे वाहन तळासह त्यानंतर जी ग्राऊड फ्लोअर-१ ग्राऊड प्लोअर -२ असे १५३ चे ८ गाठे.एकूण १३ गाळे आहे. तसेच कटकटगेट येथील सीटीएस नंबर १८०८८, ८९ मोकळी जागा व समाधान कॉलनी येथील संपादीत केलेली जागा. अशी १६ जागेची यादी दिली. धोरण निश्चित झाल्यानंतर रितसर व्हॅल्यूशन काढले जाईल.

श्री.राजू शिंदे :एकूण मालमत्ता किती व मनपाच्या नावे असलेल्या किती, १९७७ कर्ज घेतले मालमत्ता गहाण ठेवल्या होत्या त्याची परीस्थिती काय आहे. त्या मिळकती

कोणाच्या ताब्यात आहे. त्या संबंधीताने विकल्या की जप्त केल्या? सर्व माहिती द्यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेणे हाच पर्याय आहेत का ?उत्पन्न वाढविणे करीता मालमत्ता कर,होर्डींग्जचा कर,शॉप,मोबाईल टॉवर्स च्या कर वसुल करणे व करावी वसुली करणे त्यानुसार बजेट मध्ये तरतूद करून हे काम करणे हा पर्याय नाही का? यापुर्वी जागा गहाण ठेवल्या. आता पुन्हा ठेवणार असेच ठरविले का? दुसरा पर्याय निवडावा. आता म्हटले की, फक्त ५५ कोटी लागणार आहे. वार्डातील अंतर्गत लाईन टाकणेचा विषय असेल तर प्रत्येक सदस्यांच्या वार्डात ५०-५० लक्षची तरतूद केल्यास हे काम करू शकतो. आताच सांगितले की, दरमहा ८ कोटीचे देणे होणार. परत हे कर्ज घेतले तर २-३ कोटीचे भर पडेल. कर्मचाऱ्यांचे पगार करणे अवघड होईल. सर्व विचार व्हावा ही योजना पुर्ण व्हावी सर्वांची भावना आहे. परंतु कर्ज काढूनच या ठेकेदारास पैसे दिले पाहिजे असे ठरले का, विष्णूनगर ते झांबड इस्टेट नाल्यात खोलवर लाईन टाकल्या नव्हत्या. त्या आम्ही टाकायला लावल्या. असे एजन्सीचे काम होत आहे. योजनेचे काम कसे होत आहे किती काम केले किती बाकी आहे? सर्वे करावा. उर्वरीत कामासाठी बजेट मध्ये तरतूद करावी. हे ठेकेदार काम करण्यास तयार नाही असे सांगतात तर दुसऱ्याला काम देऊ शकतो. एवढा पैसे खर्च होऊन पगार होत नसेल देयक जास्त असेल तर ठेकेदार कामे करणार नाही. आजही ३५-४० कोटीचे देणे आहे. शहरातील कामे सुरू आहे. पुढील २-४ महिन्यात मोठे देणे द्यावे लागेल. ते पण प्लॅनींग करावे. योजना पुर्ण व्हावी. परंतु जागा गहाण ठेवून त्यास मोबदला द्यायचा असे होऊ नये या ठरावास सभागृह समर्थन करणार नाही. काम करायचे असेल तर मनपा फंडात तरतूद करावी. या ठरावास माझा वैयक्तिक विरोध आहे.

श्री.राजू शिंदे :५२-५५ कोटीच लागणार असे म्हटले.यातून प्रत्येक वार्डातील लाईन टाकणार काय?

कार्य.अभिंता-ड्रेनेज :७५ कि.मी. मध्ये लाईन येणार आहे. ५५ कोटीमध्ये बाकीचे या योजनेचे उपांग आहे रेल्वे क्रॉसींगचे काम आहे.

श्री.राजू शिंदे :सातारा देवळाई वगळता शहरात इतर वार्डात १३००-१४०० कि.मी. लाईन टाकाव्या लागतील. रेल्वे क्रॉसींग साठी पीएमसीने ३.५० कोटीची तरतूद केली होती ती आता किती झाली.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :३.५० कोटीवरून ती आता ७.७५ झाली आहे.

श्री.राजू शिंदे :रक्कम कशी वाढली. पीएमसीने डीपीआर चुकीचा केला का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :५२ कोटीत अंतर्गत लाईन नाही इतर कामे आहे २६० कि.मी लाईन करणार ४ एसटीपी करणार ५ एसपीएस करायचे, रायजींगमेन करायचे.

श्री राजू शिंदे :एसटीपी मोठे करून ठेवले लाईन जोडली. परंतु अॅप्रोज लाईन जोडल्या नाही. नाल्यातून लाईन न टाकता कडेने लाईन टाकली. स्लोप नाही आजही काही चेंबरमध्ये कचरा अडकला व ढापे उलटे झाले. टेक्नीकली बरोबर आहे का?

१५x१५ चे बांधले मोठा घेरा झालेला आहे. लाईन टाकल्यानंतर भविष्यात पाणी अडणार आहे

कार्य.अभियंता-ड्रेनेज :सर्व मॅन्युवल नुसार नाल्याचे वर आहे.

श्री.राजू शिंदे :जे पैसे लागणार त्याची बजेट मध्ये तरतूद करावी. महापालिकेचे ठेकेदार ही कामे करू शकतील. कर्ज काढू नये. मा.खासदार यांचे मार्फत केंद्र व राज्य शासनाकडून निधी आणू शकतो त्यांची मदत घेऊन त्यातून ही कामे करावी. या प्रस्तावास भारतीय जनता पार्टीचा पुर्ण विरोध आहे तो कायम करावा. आवश्यक वाटत असेल तर यावर मतदान घेतले पाहिजे.

मा.महापौर :मा.आयुक्त सुध्दा मत मांडणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :यास ५२ कोटी लागणार असे सांगितले सिव्हरेज टॅक्सच्या माध्यमातन ५०-५५ कोटी वसुल झालेले आहे.ते इकडे वळती का करीत नाही? कर्ज घेण्याची गरज नाही.सिव्हरेज करा बाबत वेगळे अकाऊंट केले होते का? भुमिगत गटार योजनेत मनपाचा जो हिस्सा टाकणार होतो तीच रक्कम सिव्हरेज टॅक्सच्या माध्यमातून नागरीकाकडून वसूल केली आहे. केंव्हा पासून सिव्हरेज वसूल करतो.

मा.महापौर :कर निहाय अंकाऊट काढणेची पध्दत आहेत का?

मुख्य लेखाधिकारी :सिव्हरेज कर जमा होणेसाठी अकाऊंट निर्माण केले त्यावेळेस पैसे जमा झाले नाही नंतरच्या काळात पैसे जमा केले आता १.८० कोटी जमा आहे ३ वर्षापूर्वी खाते ओपन केले. २०१२-१३ पासून सिव्हरेज कर लागलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सिव्हरेज च्या माध्यमातून ४३ कोटी मिळाले मला उत्तर दिले आहे. सुरूवातीपासून अकाऊंट ओपन केले असते तर कर्ज घेणेची गरज पडली नसती.

मा.महापौर :इतर ड्रेनेजची कामे कोणत्या फंडातून केली जातात. सिव्हरेज कर हा भुमिगत योजनेसाठी वसूल केला होता स्पष्ट माहिती द्यावी. त्याचे स्वतंत्र अकाऊंट होते का त्याच कामासाठी पैसे वापरले गेले का?

मुख्यलेखाधिकारी :सिव्हरेजचे स्वतंत्र खाते ओपन देखभाल दुरूस्तीची कामे होणेसाठी केले आहे त्यात कॅपीटल खर्चाचा समावेश नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :मनपाला जो १० टक्के हिस्सा टाकावा लागणार होता त्यासाठी सिव्हरेज कर वसूल केला होता. तत्कालीन आयुक्त यांनी त्यावेळी सभागृहात सांगितले होते. सुरूवातीपासून अकाऊंट ओपन करायला पाहिजे होते. योजना पुर्ण होई पर्यत मेन्टेनन्सचे काम करायचे नव्हते. ते खाते भुमिगत गटार योजनेसाठीच होते.

मा.महापौर :ज्या कामासाठी टॅक्स वसूल केला होता. त्याच कामासाठी खर्च व्हावे. यानंतर काळजी घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :जे वसुल केले ते नागरीकाना परत करणार आहेत का? जनतेला गटार योजना होणार म्हणून कराच्या माध्यमातून पैसे वसूल केले. अधिभार म्हणून तो कर लावला होता. योजनाच पुर्ण झाली नाही. तर देखभाल दुरूस्ती करणेचा विषय येत नाही. मतदानाचा प्रस्ताव ठेवला अनुमोदन आहे. जनतेचे पाप घेऊ नये

त्रास होईल. कर्ज घेऊन बोजा टाकू नये हा प्रस्ताव रद्द करावा. नसता मतदान घेऊनच निर्णय घ्यावा.

मा.महापौर :सर्व येणारा निधी एकत्र केला जातो. दैनंदिन सेवा देतच आहे

श्री.अब्दुल नाईकवाडी :गोलमोल उत्तर दिले जात आहे. समाधानकारक नाही. आमच्या पक्षाच्या वतीने विरोध आहे. यावर मतदान घ्यावे.

मा.महापौर :निर्णय घेतला नाही. सर्वाच्या भावना ऐकून घेतल्या जातील.

श्री.नासेर सिद्दीकी :अर्धवट प्रस्ताव आहे. ज्या प्रॉपर्टी गहाण ठेवणार आहे त्यांचे मुल्यांकन किती, त्या कुणाला दिल्या काय? हे प्रशासनाला माहित नाही. हा प्रस्ताव रद्द करावा. आमच्या पक्षातर्फे विरोध आहे. यावर निर्णय होणार असेल तर मतदान घ्यावे. प्रशासनाला सुध्दा विनंती की हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.प्रमोद राठोड :कर्ज घेऊ नये अशाच भावना सभागृहाच्या आहे. जनतेचा शाप लावून घेऊ नये. भारतीय जनता पार्टी व शहर विकास आघाडी तर्फे यास विरोध आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु विनंती की, जनतेवर कर्जाचा डोंगर उभारण्याचा जो प्रयत्न प्रशासनाच्या वतीने केला जातो. तो महापौर म्हणून आपण थांबवाल अशी अपेक्षा आहे. मा.आयुक्तांना तसे पत्रही देत आहे की, या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

श्री.विकास जैन :हा प्रोजेक्ट रु.३६५ कोटीचा होता. अबाऊने टेंडर गेले. त्यामूळे रु.४६४ कोटीची योजना झाली. ६० कि.मी मुख्य वाहिनी होत्या. ब्रॅचेंस लाईन ४५ कि.मी व इन्टरनल ब्रॅचेस लाईन १५५ कि.मी करणार असे ठरले होते. मुख्य वाहिनीची ६० ऐवजी ६४ कि.मी काम केले. ब्रॅचेस लाईन ४५ ऐवजी ४७ कि.मी केल्या. इन्टरनल लाईन १५५ ऐवजी फक्त ६७ कि.मी केल्या. उर्वरीत काम होणे बाकी आहे. मुख्य वाहिनीला ब्रॅचेस लाईन जोडण्यासाठी १५-२० कि.मी लाईन टाकाव्या लागणार आहे. आणखी इंटरनल लाईन करणे बाकी आहे. सिमेंट रस्ते मंजूर आहे. परंतु त्या ठिकाणी खालून ड्रेनेज लाईन टाकणे बाकी आहे.

श्री.प्रमोद राठोड :९५,९७ टक्के काम झाल्याचे अधिकारी सांगतात. आता जे सदस्य बोलत आहे त्यास हो म्हणतात आम्ही काय बरोबर आहे कसे समजायचे,अधिकारी चुकीची माहिती देत असेल तर कार्यवाही करावी. अधिकाऱ्याकडून कबूल करून घेत आहे.

श्री.भगवान घडमोडे :सदस्य जे सांगतात. त्यास अधिकारी हो म्हणत आहे. ९७ टक्के काम झाल्याचे अधिकारी उत्तर देतात तर काम बाकी किती आहे.

श्री.विकास जैन :मला जी माहिती आहे ती रिवाईज करीत आहे. मी त्यावेळी स्थायी समितीचा सदस्य होतो.मुख्य ,ब्रॅन्चेंस व इंन्टरनल लाईन जोडणीसाठी २० कि.मी लाईन टाकाव्या लागतील मोठे काम या प्रोजेक्टमध्ये करणे बाकी आहे.

श्री.नासेर सिद्दीकी :किती टक्के काम झाले?

(या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

कार्य.अभियंता-ड्रेनेज :इन्टरनल १५५ पैकी ६५ कि.मीटर लाईन टाकल्या. त्यापैकी १५ कि.मी क्रॉस कनेक्शनसाठी रिझर्व करावे लागेल. बाकीचे अंतर्गत लाईन वार्डामध्ये करू शकतो.

श्री.विकास जैन :९० कि.मी लाईन टाकायच्या बाकी आहे. काही वार्डात एकही लाईन टाकली नाही. एक एक वार्डात २-२ हजार मीटर लाईन टाकण्याची मागणी आहे. सिमेंटचे रस्त्याचे टेंडर झाले. ठेकेदार काम करण्यास तयार नाही. त्यांना देण्यास पैसे नाही रस्त्याचे काम होत नाही. ड्रेनेजचे काम होत नाही. पुर्वी हा प्रोजेक्ट नगरोत्थानमध्ये होता. आता अमृत योजनेत आले.

श्री. राजू शिंदे :ज्या वार्डात काम करणे बाकी आहे ते याच ठेकेदाराकडून करावे. असे बंधन नाही. मनपाने करावे. प्रत्येक वार्डात कामे होत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :कर्ज घेण्याचा विषय चालू आहे. महापालिकेच्या बजेटमधून ही कामे करण्यास हरकत काय आहे. जेथे काम झाले नाही. त्या ठिकाणच्या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करावी. ती कामे कर्ज काढूनच करावी. असे काही नाही. सभागृहनेता यांनी यादी काढली आहे. पक्षाचे सदस्यांची यादी घ्यावी. त्या कामाकरीता बजेटमध्ये ५०-५० लक्षची तरतूद करावी.

श्री.राजू शिंदे :माझे वार्डात पाठपुरावा केला तेंव्हा २५ टक्के काम केले. सभागृह नेता यांनी जी यादी तयार केली त्या वार्डातील ड्रेनेजची कामाचे अंदाजपत्रक तयार करावे काम सुरू करावे. वार्डातील इन्टरनल लाईन टाकली नाही. व मुख्य लाईन टाकल्या तर त्यांचा उपयोग होणार नाही. किती वार्डात लाईन टाकायच्या बाकी आहे? त्याची यादी करावी. अंदाजपत्रक तयार करावे. आजही ज्या मुख्य लाईन टाकल्या त्या जोडल्या नाही. जुन्या लाईन खराब झाल्या अनेक वेळा लाईन चोकअप होतात. शहरात एकूण किती लाईन टाकाव्या. लागणार आहे त्याचा खर्च किती?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :लाईन जोडण्यासाठी १५ कि.मी लाईन टाकावी लागेल. प्रोजेक्ट नुसार ७५ कि.मी टाकावे लागणार आहे २५ कोटी खर्च लागणार आहे. ब्रॅचेंस लाईन जोडणीसाठी ६ कोटी.

श्री.राजू शिंदे :रु.६ कोटी मुख्य लाईन जोडणीसाठी लागणार आहे. त्यात पाणी जाणार आहेत का? संपुर्ण नाले कोरडे होणार होते. आजही नाल्यात पाणी वाहते. मुख्य लाईन टाकल्या वार्डातील टाकल्या नाही. काम लवकर झाले नाही. तर ज्या लाईन टाकल्या त्या १-२ वर्षात खराब होणार आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :१४००-१५०० कि.मी टाकाव्या लागतील. परत प्रोजेक्ट अंतर्गत तरतूद नुसार ९० कि.मी टाकायच्या आहे. अमृत योजने अंतर्गत स्लम व सातारा देवळाई भागासाठी पुन्हा एक प्रस्ताव तयार करीत आहे.

श्री.राजू शिंदे :दि.१०-१०-२०१६ ला मला पत्र देऊन कळविले की, ९७,९६,६०,५५टक्के झाले असे दिले तेव्हा पासून आतापर्यत काम का केले नाही. एकाही वार्डात यातून आता काम होणार नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :ते एसटीपीचे कामा बाबत दिले होते. ९० कि.मीटर पर्यत काम होईल.

श्री.राजू शिंदे :वार्डातील ड्रेनेजची कामे करावी. तो पर्यत हा विषय बाजूला ठेवा.

श्री.आत्माराम पवार :१३०० कोटीचे बजेट करतो. त्यातून काम का होत नाही. १९७७ कर्ज घेतले ते हप्ते भरतो. कर्ज घेऊनच काम करायचे असे ठरविले का? दुसरा पर्याय नाही का? मा.पालकमंत्री आहे मा.खासदार मा.आमदार यांचे मार्फत शासनाकडून

निधी मिळवावा. एकीकडे ९७ टक्के काम झाले सांगतात. भविष्यात शाळा ऑफिस गहाण ठेवणार का? उत्पन्न नसेल तर कसा कारभार चालणार आहे.माझे वार्डात गुंठेवारी भाग आहे. टॅक्स भरून सुध्दा काम करता येत नाही. असे सांगतात. कर्ज घेत राहणार इन्कम सोर्स वाढविला नाही. तर उत्पन्न कसे वाढेल.मिळकती गहान ठेवूनच हे काम करायचे ठरविले का? दुसरे पर्यात आहे त्यानुसार काम करावे. माझे वार्डात एक लाईन टाकत नाही. ४६५ कोटीची योजना होती आराखडा तयार केला नव्हता का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :श्री.पवार यांचे वार्डाचा डीपीआर मध्ये समावेश नव्हता.

मा.महापौर :गुंठेवारी व अनधिकृत वसाहत सोडून तो डीपीआर तयार केलेला होता. कदाचित त्यामूळे काम झाले नव्हते. रिवाईज मध्ये काम करता येईल.

श्री.आत्माराम पवार :कर्ज घेऊन जनतेवर भार पडतो आहे. महापालिका गहाण ठेवून कर्ज घेणे योग्य नाही. दुसरा पर्याय निवडावा. लाखो रूपये कर्जापोटी व्याज भरतो आहे. सर्व मिळकतीला कर लागला असता तर कर्ज घेण्याची गरज पडली नसती.

श्री.राजू शिंदे :सर्व पक्षाचे सदस्याची मानसीकता अशी झाली की, कर्ज घेऊ नये. सर्वाच्या भावनेचा विचार करून हा विषय रद्द करावा.

श्रीमती माधुरी देशमुख :चर्चा केली आहे. निर्णय घेण्याची वेळ आली. सर्वांनी कर्ज घेणेसाठी विरोध दर्शविला आहे. आम्ही प्रश्न विचारले त्यांचे उत्तर मिळाले नाही. कर्ज घेण्यास विरोध आहे.

श्री.प्रमोद राठोड :सर्वांनी कर्ज घेण्यास विरोध केला आहे.

श्रीमती संगिता वाघुले :गुंठेवारी भागात पाणी नाही. त्यावेळी असे कर्ज काढून पाणी देण्याचा निर्णय का होत नाही?

मा.उपमहापौर :या योजनेसाठी किती खर्च झाला माहिती मिळाली नाही. ही योजना कशासाठी करीत होतो. किती काम झाले. कर्जाचा प्रस्ताव ठेवला. ही योजना पुर्ण होणार आहे काय? उपाययोजना करणार आहे. सर्व विरोध करणार आमचे मत लक्षात घ्यावे ही योजना करतांना प्रशासनाने काळजी घेतली का? किती हिस्सा मनपाचा होता किती वेळेत काम करायला पाहीजे होते? प्रशासनाने त्यांची जबाबदारी पार पाडली का? सर्व सदस्यांचे व भाजपा पक्षाच्या वतीने आमचा कर्ज घेण्यास विरोध आहे.

मा.महापौर :शहरातील भुमिगत गटार योजनेचे काम पुर्ण करण्यासाठी हुडको या संस्थेकडुन कर्ज घेणे बाबत व त्यासाठी महानगरपालिकेचा मालमत्ता तारण ठेवण्याबाबचा हा प्रस्ताव प्रशासनाकडुन विषय प्रत्रिकेत आहे. या विषयावर चर्चा सुरु असतांना सर्वच स.सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेत असतांना वेगवेगळया पध्दतीने आपली मते प्रस्तावाच्या अनुषंगाने मांडली. अनेक मुद्दे, प्रश्न उपस्थित करुन प्रशासनाला खुलासा मागितला आणि प्रशासनाच्या वतीने सुध्दा खुलासा करत असतांना तो समाधानकारक असमाधानकारक असु शकतो, परंतु प्रशासनाने वस्तुस्थिती मांडत असतांना महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती, काम करण्याची अवश्यकता आणि हा प्रकल्प पुर्ण करण्याबाबतची भावना या सभागृहाची आहे. प्रकल्प पुर्ण झाला पाहिजे, प्रकल्प कोट्यावधी रुपयांचा आहे.

थोड्याश्या आर्थिक अडचणीमुळे हा प्रकल्प अर्धवट राहू नये. अनेक प्रश्न लेखा विभागाशी संबंधीत सुध्दा आपण उपस्थित केले. आधी किती कर्ज घेतले, त्याची परत फेड, उत्पन्न वाढवण्याचा पर्याय, तसेच ज्या प्रोजेक्टमध्ये इसेंशियल किती रक्कम आवश्यक आहे? हा प्रोजेक्ट पुर्ण करण्या करता त्यावर सुध्दा चर्चा झाली. लेखा विभागाच्या माध्यमातुन बरीचशी माहिती एकत्रित करुन स.सदस्यांना देण्याकरिता थोडेसे अवघड झालेले असतांना त्याच वेळेस आदेश दिले होते की, सर्वच माहिती एकत्रित करुन सर्व सदस्यांना देणे अपेक्षित आहे. एक लेखा-जोखा, महानगरपालिकेचे एक्प्रीडीचर खर्च, लोन रिपेमेन्ट, दैनंदिन लागणार खर्च आणि विकास कामे, राहिलेल्या खर्चातुन त्यातली विकास कामे कशा पध्दतीने करायची खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ कसा करणार? स.सदस्यांना अपेक्षित होता. निर्णय देत असतांना संबंधीत अधिकारी यांना याठिकाणी आदेशित करतो, मुख्यलेखा अधिकारी आपण ज्या ज्या सदस्यांनी प्रश्नांची आणि मुद्यांची माहिती विचारली ती एकत्रित करुन तयार ठेवावी. बऱ्याच सदस्यांनी वार्डामध्ये काम झाले नाही, का झाले नाही, नाले साफ का झाले नाही, नाल्यातले पाणी का वाहते, रस्त्याचे कॉक्रीटीकरण का झाले नाही? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे तीन दिवसात माझ्याकडे पाठविण्यात यावी. कोणत्या मालमत्ता आधी गहाण ठेवलेल्या आहेत, त्याचे मुल्यमापन काय, आणि अत्यंत महत्वाच्या मालमत्ता कुठल्याही प्रकारे गहाण ठेवता येणार नाही याची काळजी घ्यायची आहे. या आधी ज्या मालमत्ता गहाण ठेवलेल्या आहेत, ज्या कारणा करता ठेवल्या, त्याची तपशिलवार माहिती आणि भविष्यामध्ये तारण ठेऊन कर्ज घेण्याचा असा प्रसंग आला तर त्यामध्ये कोणत्या प्रकारची मालमत्ता गहाण ठेवणार आहोत. वृत्तमान पत्रातुन बातम्या येत असतांना महानगरपालिकेची मुख्य इमारत, अग्निशमन केंद्र, वार्ड कार्यालय, सिध्दार्थ उद्यान, अशा प्रकारच्या महत्वाच्या मालमत्ता गहाण ठेवण्याचा विचार करु नये. दुय्यम दर्जाच्या अडगळीत पडलेल्या मालमत्ता, उदा.खुल्या जागा तारण घेऊन कर्ज द्यायला तयार असतात. एक पर्याय दिला होता की, सालवंसी प्रमाणपत्र प्रत, किंवा रोख स्वरुपाची जी रक्कम असते अशा पध्दतीचे दोन पर्याय असतात. तो सुध्दा पर्याय आपण तपासुन पाहावा. मनपाच्या मालमत्ता ऑडिट करणे आवश्यक आहे. महापालिकेच्या एकुण मालमत्ता, त्याचे मुल्यमापन, आजची स्थिती, हे तपासणे गरजेचे आहे. याठिकाणी विषय क्र.१७० च्या अनुषंगाने ही सभा ८ फेब्रुवारी पर्यंत तहकुब करण्यात येत आहे. त्या सभेमध्ये तो निर्णय घेण्यात येईल आणि दुसरी नियमीत दुपारची सभा ८ तारखेलाच दुपारी २ वाजता घेण्यात येईल.

ही सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद